ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–XIII, Issues–III

May – June 2026

Original Research Article

# विकसित भारतासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचा तात्विक पाया

***प्रा. संगीता रमाकांत जाधव**

** बहिणाबाई महिला शिक्षणशास्त्र महाविध्यालय नाशिक*

**सारांश:**

*भारतीय ज्ञान व्यवस्थेला एक समृद्ध आणि विस्तृत परंपरा लाभलेली आहे. विविध विद्याशाखा आणि प्राचीन संस्कृतीमुळे भारतीय ज्ञान प्रणाली समृद्ध झालेली आहे. तिचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. पुराण योग आयुर्वेद□संस्कृत□साहित्य वेद□उपनिषदे□कला यासारख्या अनेक ज्ञान शाखा मध्ये ते विकसित झाली असून आजच्या विकसित भारत संकल्पनेच्या पूर्तीसाठी पायाभूत तत्वांचा आधारभूत स्तंभ म्हणून भारतीय ज्ञान प्रणालीचे मोलाचे योगदान असणार आहे. विकसित भारतासाठी भारतीय ज्ञान प्रणाली हा केवळ ऐतिहासिक वारसा नव्हे तर एक भक्कम तात्विक आणि वैज्ञानिक पाया आहे. सर्वात प्राचीन तत्त्वज्ञान ग्रंथ म्हणजे वेद. वेदातील तीनही ज्ञान, कर्म आणि उपासना कांडा मध्ये नैतिक व जीवनमूल्य विषयीचे ज्ञान विकसित आहे. तत्त्वज्ञानामध्ये ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान आणि मोक्ष हे अंतिम उद्दिष्ट मानले जाते. सृष्टी व जीवन यांच्या अंतर्गत असलेल्या मूल्यांचे निश्चितीकरण करून विश्वाचे सत्य जाणून घेणे हे तत्त्वज्ञानाचे प्रमुख कार्य आहे. भारत हा विश्वगुरू म्हणून जगासमोर येताना येथील सर्व ज्ञान, विज्ञान, मूल्ये यासारख्या विद्याशाखांचा विकास हा क्रम प्राप्त आहे. प्राचीन आणि आधुनिकतेचे एकत्रिकरण करून एक आदर्श भारत विश्वा समोर येईल. समाजामध्ये योग्य ती क्षमता आत्मज्ञान, प्रचिती सुसंस्कृत जीवन व त्यावर आधारित जीवनशैली आत्मनिर्भरता निर्माण होणे गरजेचे आहे. अपेक्षित समाजाची जडणघडण योग्यरीतीने होण्यासाठी प्राचीन ज्ञान प्रणालीतील ज्ञानाला प्राथमिकता देणे हे अपरिहार्य आहे. भारतीय संस्कृती हा एक प्रचंड प्रवाह आहे आणि संस्कृती परिवर्तनशील असल्यामुळे प्राचीन ज्ञान परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या संयुक्त विद्यमाने आपल्याला विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करणे किंवा साकारणे सहज शक्य होईल. सुसंस्कृत जीवनात बाह्य समृद्धी बरोबरच मन, बुद्धी आणि पंच इंद्रिये यांच्यावर ही नियंत्रण असावे लागते त्यासाठी योग, अभ्यास, ध्यान, धारणा, अध्यात्मिक विकास याचे ज्ञान आपल्याला पूर्ववतच लाभलेले आहे.*

**Copyright © 2026 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना :**

आपल्या भारतीय ज्ञानाला ५००० वर्षाहून अधिक पूर्वीची परंपरा लाभलेली आहे. आजच्या युगासाठी हा एक अनमोल ठेवा आहे. भारतीय ज्ञान प्रणाली मध्ये मानव जीवसृष्टी यांच्या विकासाच्या दृष्टीने अखंड ज्ञानाची निर्मिती करणे हेच वैशिष्ट्ये आहे. सर्वात प्राचीन ज्ञान परंपरा म्हणून भारतीय ज्ञान प्रणालीचा उल्लेख केला जातो. संपूर्ण मानव जात व सृष्टीच्या उध्दारासाठीची श्रेष्ठ तत्वे, नियम, तत्त्वज्ञान प्राचीन वैदिक धर्मात अंतर्भूत आहेत. भरत या शब्दावरून भारत हा शब्द आला असून त्याचे भा म्हणजे प्रकाश ज्ञान आणि रत म्हणजे लीन किंवा गुंतलेले यावरून जिथे लोक ज्ञानाच्या ज्ञानसाधनेत मग्न असतात ती भूमी असा अर्थ होतो. तत्त्वज्ञान, विज्ञान, कला, साहित्य, धर्म योग, औषध शास्त्र, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र आणि वास्तुकला यांचा एकत्रित अभ्यास हजारो वर्षापासून झालेला

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–XIII, Issues–III May – June 2026

Original Research Article

आहे. तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला, काशी या प्राचीन विद्यापीठाद्वारे हे ज्ञान संपूर्ण जगात पसरविले जात असे. संपूर्ण मानव जातीचा विकास निसर्गाशी समतोल राखून करणे हे याचे प्रमुख तत्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये सर्वांगीण विकासासाठी ज्ञानाचे आकलन होऊन कौशल्य आधारित समाज किंवा शिक्षणावर भर देण्यात आला आहे. भारताला महासत्ताक राष्ट्र म्हणून पुढे येण्यासाठी ज्ञाना आधारित समाजाची गरज आहे. ज्ञान हा शब्द जाणणे या धातूपासून निर्माण झाला असून त्याचा संबंध जाणीवेशी असून इंद्रियेच्या माध्यमातून तसेच अनुभवातून ज्ञानाची निर्मिती होते. ज्ञान हे अनुभव निरीक्षण आणि प्रयोगावर आधारित आहे. भारताला महासत्ताक किंवा विकसित बनविण्यासाठी समर्थ, शिक्षित, सुसंस्कृत, कार्यक्षम, मजबूत म्हणजेच सर्वांगीण विकास होणे अत्यंत गरजेचे आहे आणि त्याच दृष्टीने विचार करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान प्रणालीच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. विकसित भारत ही संकल्पना भारतीय ज्ञान प्रणालीच्या पायाभूत तत्त्वावर भक्कमपणे उभी राहू शकते त्यामुळे समाविष्ट असलेल्या विविध विद्याशाखांचा सखोल अभ्यास,संशोधन, योग्य धोरण, त्रुटी तसेच दोन्ही संकल्पनांचा समन्वय ही अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे.

**१. ज्ञान परंपरेचे संवर्धन करणे आणि प्रसार ः**

शैक्षणिक धोरण एन इ पी २०२० अंतर्गत शालेय आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासामध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश करणे जेणेकरून विध्यार्थाना त्यांच्या मुल संस्कृतीची आणि बांधलकीची जपणुक करणारा असला पाहिजे आणि असा समाज निर्माण झाल्यामुळे समाजतील विवेक शून्यता कमी होउन प्रगतीकडे वाटचाल करणे सहज शक्य होउल.

**२. मानवी मूल्यांचे जतन ः**

भारतीय संस्कृती ही विश्वात सर्वश्रेष्ठ मानली जाते, रामायण महाभारत यासारख्या संस्कृतीचे आधारस्तंभ असणाया महाकाव्यातून कर्त व्यदक्षतेची जाण समाजाला दिली आहे. विकसित भारतासाठी केवळ ज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्य हे पुरेसे नाही तर नैतिक आणि जीवनमूल्य अंगीकत करणाऱ्या समाजाची निर्मिती महत्त्वाची आहे. प्रामाणिक आणि पारदर्शक प्रशासन हे विकसित भारतासाठीच प्राथमिक लक्षण आहे. कर्तव्यदक्षता, निष्ठा, संवेदनशीलता, शिस्त यासारख्या मूल्यांचा विकास भारतीय विकासासाठी महत्त्वाची बाब आहे. शाश्वत विकासासाठी विध्वंसक गोष्टीचा नाश होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे प्राचीन मूळ संस्कृती ज्ञान प्रणाली हा महत्त्वाचा गाभा आहे.

**३. विश्वची माझे घर ः**

संपूर्ण विश्व हे कुटुंब आहे या संकल्पनेचे बीजे भारतीय ज्ञान प्रणालीत रूजवली आहेत. 'वसुदैवकुटुंबकम्' ही एक अत्यंत महत्त्वाची आणि उदात्त संकल्पना आहे. जागतिक एकता विश्वबंधुता आणि सहकार्याचे प्रतीक यामध्ये दिसून येते. जागतिक समस्यांना तोंड देण्यासाठी उदाहरणार्थ कोविड, जी २०२० शिखर परिषद यासारख्या जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी एकजुटीने प्रयतन केले गेले त्यामुळे राष्टीहिताचे कार्य घडले सर्वभोवती समभाव या विचारांचा प्रवाह पुढे प्रवाहित होणे आवश्यक आहे. त्यामुळे एकात्मता, एकजूट टिकवून ठेवणे वैश्विक शांतता निर्माण करणे परस्पर संबंध, परस्पर सहकार्य निर्माण करणे या गोष्टी साध्य होतात तसेच अशाच संस्कृतीतून आपल्याला भारताला महासत्ताक बनवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**४. तत्त्वज्ञान आणि विज्ञान व तंत्राज्ञान ः**

भारतीय प्रणाली सैदांतिक नव्हे तर निरीक्षण प्रयोग आणि सखोल विश्लेषणातून विकसित झाली आहे. तत्त्वज्ञानामुळे विचारांना

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–XIII, Issues–III

May – June 2026

Original Research Article

चालना मिळते आणि तंत्राज्ञानातून त्याचा शोध सिद्धता निर्माण होते त्याच्यातील समतोलामुळे मानवी जीवन व सजीव सृष्टींचे जतन व विकास साध्य करता येतो. भारताला जागतिक स्तरावर उच्च स्थानी नेण्यासाठी बौद्धिक आणि तांत्रिक प्रगती मानवतावादी दृष्टिकोन निमाण होणे गरजेचे आहे आणि या तत्त्वज्ञानाने आपल्याला या गोष्टींच्या परिपक्वतेचा आणि विज्ञानाने प्रगत होण्याचा मार्ग दाखविला आहे.

**५. पर्यावरण आणि शाश्वत जीवन :**

प्राचीन भारतीय अध्यात्म वादात शाश्वतवादाचे विचार सूत्रा सापडतात प्राचीन ज्ञानाच्या मूल्यांची मूलभूत विचारधारा आधुनिक काळात सुद्धा उपयुक्त आहे आणि या फक्त उपयुक्तेतून शाश्वतवादाची निर्मिती झाली शाश्वत सत्याचे ज्ञान म्हणजे शाश्वत आनंद व शांती हे आहे. ही सर्वश्रेष्ठ मूल्य प्राचीन ज्ञान परंपरेतून मिळाली असली तरी बौद्धिक विकास उदारमतवाद् अध्यात्मिक शहाणपण विकसित होणे ही भविष्यकालीन ध्येय साध्यतेसाठी आवश्यक आहे. उदाहरणार्थ आजच्या पर्यावरण संबंधित अनेक समस्यांना मानवांना सामोरे जावे लागत आहे भारतीय ज्ञान प्रणालीत वृक्षांचे महत्त्व् वृक्षांचे पूजन या संकल्पनांना महत्त्वाचे स्थान होते. आजच्या विज्ञान दृष्टीचा विचार केल्यास निर्माण झालेल्या विविध पर्यावरणीय समस्यांना मानवत जबाबदार आहे असे आढळून येते पण समस्यांचे निर्मूलन करायचे असेल तर पूर्वी प्रमाणेच निसर्गप्रेम् निसर्गाची जपणूक् जतन करणे अनिवार्य ठरते. विकसित भारताची स्वप्न साकारण्यासाठी पर्यावरणचा नैसर्गिक समतोल राखणे तसेच पर्यावरण जाणिव आणि जागृती करणे गराजेचे आहे. भविष्य भविष्यातील पिढ्यांच्या गरजांची तडजोड न करता आर्थिक विकासाबरोबरच नैसर्गिक संसाधनांचे जतन करून भारतीय शाश्वत विकासाचे स्वप्न पूर्ण करता येईल नद्या पर्वत् झाडे प्राणी यांना केंद्रस्थानी मानवी जीवनात ठेवुन आपल्या प्राचीन संस्कृतीने आपल्याला दिलेल्या ज्ञानाचा वारसा हा विकसित भारत संकल्पनेसाठी पायाभूत घटक म्हणून वापर मानवी विकास आणि नैसर्गिक पर्यावरण आज समतोल आवश्यक आहे.

**६. आयुर्वेद योग आणि आधुनिक विज्ञानाचा सहसंबंध :**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये आयुर्वेदिक् योग् गणित् खगोलशास्त्रा यासारख्या विविध विषयांचा समावेश आहे. आज संपूर्ण विश्वामध्ये भारतीय आयुर्वेदास महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. त्याचप्रमाणे योग खगोलशास्त्राचेही आहे. आधुनिक संशोधनातून निर्मित तंत्रा यंत्रा आणि ज्ञान त्याला मराठी ज्ञानाची जोड दिल्यास उत्कृष्ट दर्जाचे ज्ञान् कौशल्य यांची निर्मिती होऊन राष्ट्र विकसित होण्यास चालना मिळेल. श्वस्थ निरोगी सवल अशी समाज निर्मिती होइल आणि तिचा उपयोग विकसित भारताच्या ध्येयासाठी मोल्यवान ठरेल.

**७. सर्वांगीण विकास :**

सर्वांचे विकास भारत हे विकसित राष्ट्र म्हणून उदयास यायचे असेल तर समाजाचा आर्थिक् मानसिक् शारीरिक विकास होणे गरजेचे आहे .प्राचीन संस्कृती परंपरांनी ज्ञान् शोध् अर्थ् काम् मोक्ष प्रचीती् एकात्मिक विकास् सहकार्य् शाश्वत विकास या सर्वांचे मूळ आणि मौलिक विचार प्रवाह दिले आहेत. त्याचा संसाधन म्हणून वापर करून समाजामध्ये नवीन शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण करून नवनवीन संशोधन् समाज विधायक कार्य् प्रगती विकास सामंजस्य यांना प्रोत्साहन देऊन मूळ विचार प्रवाहाला नवी दिशा देता येइल नवीन पिढी केवळ ज्ञानानेच नव्हे तर मानसिक दृष्ट्या ही सक्षम आणि नैतिक मूल्यांचे भान जबाबदार सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व

वनविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले पाहिजे.

८. **आत्मनिर्भरता ः**

विकसित भारताचे ध्येय हे भारतीय ज्ञान प्रणाली आणि आधुनिकता यांचया एकत्रिकरणातून साध्य होऊ शकते. भहुतेक प्रगती वरोबरच मुल्य आधारित विकास नैतिकता महात्वाची आहे राष्टीय शैक्षणिक धोरणांमध्ये भारतिय प्रणालीचा समावेश म्हणजेच नवीन पिढीला प्राचिन संस्कृती आणि वैज्ञानिक वारसा यांचा समन्वय करून देणे होय भारतामध्ये स्वदेशीचा स्वीकार होउन उदयोग धंधाना बळ मिळेल पायाभुत सुविधांची उपव्धता आधुनिक शेती तंत्राज्ञान कोशल्य संशोधन यांचा विकास होउन विकसित भारताच्या संकल्पनेस वळकटी मिळेल.

९. **विविध कला ः**

कला कलांचे माहेरघर म्हणजेच भारतीय प्राचीन संस्कृती असे म्हटल्यास अतिशय युक्ति होऊ नये. स्थापत्य कला प्राचीन काळी असलेल्या विविध शैलींचा विकास मंदिरांची कोरीव कामे चित्राकला संगीत नृत्य वादन अशा अनेक विविध कलांचा विकास आणि उगम या प्रणालीत झाला त्याचा आधुनिक नवदृष्टिकोन ठेवल्यास हा युगाच्या उन्नतीचा मार्ग होईल आणी कलेस वाव प्राधान्य दिल्यास नवनवीन कला शास्त्रा स्थापत्य शिल्प यांची निर्मिती होऊन स्वयंपूर्ण भारतीय नवकला या संकल्पनेचे निर्मिती होऊन राष्ट्र विकासाचे ध्येय पूर्ण त्याकडे जाण्यास मदत होईल.

१०. **भाषा आणि गणित ः**

भाषा आणि गणित यांचा विचार करता भारतीय भाषा आणि संस्कृतीच्या जतनामुळे भारताची एक सुसंस्कृत देश अशी ओळख झाली आहे. पण हाच वारसा पुढे चालवण्यासाठी नवनवीन ज्ञानाची साहित्याची निर्मिती आवश्यक आहे. यांनी शैक्षणीक धोरण एन इ पी २०□0 च्या उद्दिष्टानुसार मातृभाषेसह त्रिभाषा सुत्रास महत्व दिले गेले मातृ भाषेतून शिक्षणात देणालया या विचारधारेमुळे मनातील विचार भावना ज्ञान व्यक्त करता आल्याने विविध कला काव्य काव्य एकूण वांग्मय व साहित्याची निर्मिती होईल तसेच नविन शास्त्रीय दृष्टिकोन वैचारिक मतभेद व्यक्त करता आल्यामुळे नवप्रवाहांची निर्मिती होईल त्याचा उपयोग विकसित भारतासाठी होऊन विविध प्रकारच्या संशोधनास चालना मिळेल. प्राचीन भारतीय गणितज्ञा यांनी खूपच महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. शून्याचा शोध दशांश पद्धती भास्कराचार्यांची वीजगणित पद्धत बोधायमाळ पायथागोरसचे सिद्धांत जे आजही आपण अभ्यासतो याचा मजबूत पारंपारिक ज्ञानाचा पाया असल्यामुळे नवनवीन संशोधनास वाव मिळतो नवीन दिशा मिळतात गणित हे ग्रोविंग ॲप्टिटयूट इंनोवेशन्स ॲन्ड ट्रेंनिंग चे लघुरूप म्हणूनही ओळखले जाते जे दरवर्षी आपण २२ डिसेंबरला राष्ट्रीय गणित दिन म्हणुन साजरा करतो अशा या प्राचीन विशाल आणि व्यापक ज्ञान प्रणालीतील ज्ञानाचा वारसा हा पुढील पिढीकडे समर्पित करताना या प्रणालीचे नवनिर्वाचित कार्य सुरू करणे गरजेचे आहे आणि पारंपारिक शिलालेख हस्तलिखिते मौखिक ज्ञान यांची माहिती नवीन पिढीकडे पोहचविण्यासाठी एक नवीन प्रणाली विकसित केली तीच ही भारतीय ज्ञान प्रणाली होय.

११. **भारतीय ज्ञान प्रणाली व कार्य ः**

मंत्रालयाच्या बरोबरीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने इंडियन नॉलेज सिस्टीम हा प्रकल्प राबविण्यात आला. नवी दिल्ली येथे ए आय सी टी चे केंद्र आहे.

१. ज्ञान परंपरेचे संवर्धन करणे आणि प्रसार. शैक्षणीक धोरण एन इ पी २०३० अंतर्गत शालेय आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासामध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश करणे जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ संस्कृतीची आणि ज्ञानाची ओळख होईल. भारताच्या हजारो वर्षाच्या समृद्ध परंपरेतील ज्ञानाचे जतन करून ते समाजासमोर आणणे हा मुख्य उद्देश या प्रणालीचा आहे.

२. आंतरविद्याशाखीय संशोधन भारतीय ज्ञान प्रणालीच्या विविध पैलूंवर जसे की गणित खगोलशास्त्रातत्त्वज्ञान व्यवस्थापन आणि अर्थशास्त्रा इत्यादी विषयावर आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन करून संशोधनास निधी व मान्यता देणे.

३. डिजिटल डिपॉझिटरी भारतीय ज्ञानावर आधारित पुस्तके लेक्चर्स व्हिडिओज यांचे जतन करणे प्रायोगिक उपयुक्तता समकालीन समस्यावर उपाय शोधण्यासाठी भारतीय ज्ञानाचा वापर करणे.

४. शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

५. अभ्यासकम तयार करणे इत्यादी कामे केली जातात.

भारतीय तत्वज्ञानामध्ये गुरू शिष्य परंपरेला महत्त्वाचे स्थान होते. प्राचीन गुरूं केंद्रस्थानी असल्याने त्यांना मानाचे स्थान होते म्हणून विद्यार्थ्यांना नियमांचे पालन करणे आदरव्युक्त करण्यासाठीचे शिक्षण दिले जात असे आजच्या आधुनिक काळामध्ये शिक्षणात झालेल्या बदलामुळे शिक्षक किंवा गुरू यांचे स्थान पूर्वीप्रमाणे केंद्रस्थानी न राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये आदरभाव कमी झालेला दिसून येतो. विकसित भारतासाठी प्रगत ज्ञानी शिस्तप्रेम नेतत्वगुण यासारख्या अनेक गुणांनी परिपुर्ण समाजाची गरज आहे आणि त्यासाठी प्राचीन आणि आधुनिकतेचा समन्वय गरजेचे आहे.

**निष्कर्ष ः**

भारतीय ज्ञान प्रणालीचे पुनर्जीवन करून आधुनिकतेच्या मार्गाने निश्चित ध्येय धोरणांचा आराखडा तयार केल्यास भारत हा आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वगुरू बनेल. भारताला महासत्ताक बनवण्यासाठी उच्च दर्जाचे ज्ञानकौशल्यशिक्षणअनुशासनमानवी मूल्यश्रम विनम्रताआत्मनिर्भरता यासारख्या गुणांचा विकास अनिवार्य आहे. आपल्या भारतीय प्राचीन ज्ञान प्रणाली मध्ये आपल्या संस्कृतीने जगापुढे विश्वगुरू म्हणून स्थान मिळवण्यासाठीचे भक्कम आधारस्तंभ उदयच्या उन्नत आणि संस्कृत भारताच्या विकासासाठी दिलेले आहेत. भारताला विकसित राष्ट म्हणुन जगासमोर प्रसिध्दीस येण्यास भारतिय ज्ञान प्रणालीच्या मध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सांस्कृतीकपारंपारिक ज्ञानचाविज्ञाननिसर्गत्वप्राचीन कलासंस्कारसंस्कृती यांचा आदर सर्व वेदउपनिषदे यांच्यामध्ये सांगितलेल्या तत्वांचा आधारभूत तत्वे यांचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. नवीन ज्ञानतंत्राज्ञान यांनी विकसित झालेले आत्मनिर्भर राष्ट्र म्हणुन निर्माण होणे गरजेचे आहे. विकसीत भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी १४ विद्या आणि ६४ कलांनी समृद्ध असलेल्या प्रचंड भारतीय ज्ञान प्रणालीच्या तत्त्वाचा वापर करून ससंस्कृतकुशल सुजाण समाजाची निर्मिती महत्वाची आहे. मानवाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व्यक्ती विकास कौशल्य आधारित शिक्षण व व्यावहारिक ज्ञान संशोधन विकसित तंत्राज्ञान निश्चित ध्येय धोरणेनियमयोजनाबद्ध कार्यकमृमातृभाषा शिक्षण यांची गरज आहे. विकसित भारताच्या संकल्प पूर्तीसाठी आवश्यक आहे. योग्य वेळी अचूक प्राचीन ज्ञान प्रणालीचा वापर करून नवनवीन कलाज्ञानाचे निर्मिती चा समन्वय आवश्यक आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–XIII, Issues–III

May – June 2026

Original Research Article

**संदर्भ ग्रंथ सूची :**

*१. भारतीय ज्ञान परंपरा आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मार्च २०२४ मांडवकर पवन महाराष्ट्र टाइम्स डॉट कॉम.*

*२. भारतीय संस्कृती कोश खंड दहा महादेव शास्त्री जोशी.*

*३. भारतीय ज्ञान परंपरा जाधव संदीप २०२५ पुणे.*

*४. शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र कुंडले म. बासरी विद्या प्रकाशन पुणे. १९९६*

५ .*http://iksindia.org*

६ .*https://prabhakarpublication.in*

*Cite This Article:* प्रा. जाधव सं.र. (2026). *विकसित भारतासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचा तात्विक पाया.* **In Educreator Research Journal: Vol. XIII (Issue III),** pp. 471-476